सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१

दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १८३

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१८/०२/२०२२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१२४ ते ठराव क्र.१८१ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

तसेच, मा.महासभा ठराव क्र.१४१ दि.२०/१२/२०१९ अन्वये पारित झालेल्या ठरावामध्ये चौ.फुट असा उल्लेख असून, सदर ठरावामध्ये चौ.फुट ऐवजी चौ.मीटर अशी दुरुस्ती करणेस सहा.आयुक्त तथा मालमत्ता व्यवस्थापक यांचे दि.१७/१२/२०२१ रोजीचे मागणी पत्रानुसार दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, मा.महासभा ठराव क्र.६४ दि.१९/०७/२०२१ अन्वये पारित झालेल्या ठरावामध्ये वॉर्ड क्र.१० मधील सि.स.नं.१६९/१ ऐवजी सि.स.नं.२६९/१ अशी दुरुस्ती करणेस सहा.आयुक्त तथा मालमत्ता व्यवस्थापक यांचे दि.१७/०२/२०२२ रोजीचे मागणी पत्रानुसार दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

त्याचप्रमाणे मा.महासभा ठराव क्र.१२८ दि.२०/११/२०१९ अन्वये पारित झालेल्या ठरावामध्ये सांगली शहरातील ऐवजी कुपवाड शहरातील अशी दुरुस्ती करणेस सहाय्यक संचालक नगररचना यांचे दि.१३/०४/२०२२ रोजीचे पत्रानुसार दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते

D. P. Suryavanshi
महापौर,

महासभा विभाग
मालमत्ता व्यवस्थापक
स.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १८४

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

अब्जावधी अंत:करणात चार पिढ्यांपासून प्रदीर्घ काळ रसिक मनावर आपल्या अवीट, दैवी सुरांनी अधिराज्य गाजवणाऱ्या सांगली नगरीशी अतुट नाते असलेल्या गानसम्राज्ञी "भारतरत्न लता मंगेशकर तथा दीदी" यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी रविवार दि.०६ फेब्रुवारी २०२२ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने रसिकश्रोते, चित्रपटसृष्टी आणि व संगीत सृष्टीवर मोठा आघात झाला असून, त्यांच्या असंख्य चाहत्यांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.भारती हेमंत दिगडे

अनुमोदक :- सौ.नसीम सलीम शेख

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi,
महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १८/०४/२०२२

महासभा क्रमांक :- ०१

ठराव क्रमांक :- १८५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे मानधन वायरमन म्हणून कार्यरत असणारे श्री.सचिन गुरुनाथ माळदकर यांचे दि.१६/०४/२०२२ रोजी अनपेक्षीत असा दुर्दैवी मृत्यु झाला. श्री.माळदकर हे महानगरपालिकेचे मानधन तत्वावर गेली १४ वर्षापेक्षा जास्त काळ वायरमन या पदावर कार्यरत होते या १४ वर्षामधील त्यांचे कार्य हे उल्लेखनीय होते. मनमिळाऊ,विनयशिल,प्रामणिक कर्मचारी आपलेतून निघून गेले आहेत. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १८६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील काळीखण सुशोभिकरणासाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करुन ८ कोटी पैकी ४ कोटी रुपये निधी महापालिकेकडे वर्ग करण्याचा आदेश झालेला आहे. मा.ना.जयंतरावजी पाटील साहेब पालकमंत्री, सांगली जिल्हा यांच्या प्रयत्नाने व सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या पाठपुराव्यामुळे निधी मंजूर झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. शेडजी सुबराव मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Surwase

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१

ठराव क्रमांक :- १८७

दिनांक :- १८/०४/२०२२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

कोल्हापूर उत्तर मतदारसंघ पोटनिवडणूकीत महाविकास आघडीच्या उमेदवार मा.जयश्रीताई चंद्रकांत जाधव यांची आमदारपदी भरघोस मतांनी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. शेडजी सुबराव मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १९८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष संजयजी बजाज यांची भारत सरकारच्या टेलिफोन तांत्रिक सल्लागार समिती वर सदस्य पदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान

अनुमोदक :- श्री. शेडजी सुबराव मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १८९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ.सुनंदाताई राऊत यांना न्युज लाईन,मुंबई यांच्याकडून सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल राजकर्ता २०२२ ने सन्मानित केले आहे. तसेच नगरसेविका सौ.सविता मदने यांना स्त्री प्रतिष्ठा समाज सेविका सन्मा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- ॲड.स्वाती नितीन शिंदे

अनुमोदक :- श्री.रणजीत पाटील सावर्डेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Surywanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१

ठराव क्रमांक :- १९०

विषय क्रमांक :- ०४

दिनांक :- १८/०४/२०२२

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,मिरज) यांचे दि.१४/०३/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील पंढरपुर रोड वरील स.नं.९६९/१ ब जागेत श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुतळा फार पुर्वी बसविलेला असून, तो कालामानाने खराब झाला असल्याने त्या ठिकाणी नविन अश्वरुढ ब्राँझ धातूचा पुतळा बसविणे कामी अधिनियमातील तरतुदीनुसार रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरची कामगिरी श्री.धनाजी संभाजी खरात, सांगली यांचे नावे मंजूर आहे. तसेच, सदर अश्वरुढ ब्रॉझ धातूचा पुतळा बसविणेच्या क्लेमॉडेलला कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांची दि.२०/१०/२०२१ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार मिरज येथील पंढरपुर रोड वरील स.नं.९६९/१ ब जागेत श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांचा अश्वरुढ ब्राँझ धातूचा पुतळा बसविणेस महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.३१०२/८८४/प्र.क्र.१२२/२०१२/२९ दि.०२ फेब्रुवारी २००५ नुसार विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनु हीन कागलान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.गोडजी मोहिते

D.P.Suryavanshi
महापौर,

सहायक आयुक्त

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १९१

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.११/०३/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

दिव्यांग सक्षमीकरण अभियान (D.E.P.) महानगरपालिका क्षेत्रातील सन २०२१-२२ या वर्षातील ५% मागासवर्गीय निधी र.रु.३.०४ कोटी व महिला व बालकल्याण समिती र.रु.३.०४ कोटी अशी एकूण र.रु.६.०८ कोटी वरती ५% याप्रमाणे ३०.४० लक्ष दिव्यांग कल्याण तरतुद करणेत आली आहे. सदर निधीतून दिव्यांग व्यक्तींना उदरनिर्वाह भत्ता अदा करणेसाठी १६२८ दिव्यांग हयात प्रमाणपत्र आजअखेर प्राप्त झालेनुसार ५% दिव्यांग कल्याण निधी तरतुद र.रु.३०,४०,०००/- मात्र प्रमाणे १६२८ दिव्यांग व्यक्तींना १८०० याप्रमाणे र.रु.२९,३०,४००/- मात्र उदरनिर्वाह भत्ता देणेत आलेला आहे त्यास ही सभा सहमती दर्शवित असून, अद्याप ज्या दिव्यांग व्यक्तींनी हयात प्रमाणपत्र दिलेले नाही अशा उर्वरित दिव्यांग व्यक्तींचे हयात प्रमाणपत्र मार्च २०२२ अखेर प्राप्त झालेस त्यांनाही उदरनिर्वाइ भत्ता देणेस तसेच, वरील प्रमाणे दरवर्षी मार्च महिन्यापूर्वी दिव्यांग उदरनिर्वाह भत्ता आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महापालिकेच्या वतीने प्रत्येक वर्षी ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन साजरा करणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रोहिणी मोहिते. D.P. Suryavanshi महापौर,

दिव्यांग कक्ष प्रमुख.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १९२

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.२५/०२/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील तमाशा सम्राट कै.बाबूराव कुपवाडकर स्मारक आवारातील खुले नाट्यगृह परिसरात बंधीस्त शेड उभा करणे र.रु.१५,१५,४८२/- मात्रचे कामाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीस्तव पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेल्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली कामे योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.-एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दिनांक ०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.-२ अभियानाअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केले असून सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणे करीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवली आहे.

अ. क्र.	सुधार कार्यक्रम	सद्यस्थिती	पुर्ण करण्याचा कालावधी
१.	व्दिनोंद लेखापध्दतीचा अवलंब करणे	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
२.	महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे.	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
३.	मालमत्ता करविषयक सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
४.	उर्वीत उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
५.	गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे.	तरतुद करणेत आली आहे.	-

त्याचप्रमाणे प्रकल्प राबविणे करीता महापालिका हिस्सा यासाठी आवश्यकते नुसार वेळोवेळी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणेस महापालिका तयार आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या कुपवाड येथील भुयारी गटार योजनेस मा.महासभा ठराव क्र.५६ दि.१९/०७/२०२१ अन्वये मान्यता देणेत आलेली असून, महासभा ठराव क्र.१३७ दि.१८/०२/२०२२ अन्वये कुपवाड भुयारी गटार योजनेसाठी मा.शासन योजनेनुसार महापालिकेस भरावा लागणारा स्वहिस्सा १४ व्या / १५ व्या वित्त आयोगातून अथवा मनपा निधीतून भरणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यास अनुसरुन ही सभा आदेशित करते की, कुपवाड ड्रेनेज योजना कार्यान्वित झाल्यानंतर लाभधारक सर्व मालमत्तांना सामान्य कराच्या ८% इतक्या दराने मलनि:सारण कर आकारणी करणेत यावी तसेच ज्या मालमत्तांना पाणीपट्टी आकारणी केली जात नाही अशा सर्व मालमत्तांना पाणीपट्टी किमान रु.३२०/- प्रति दोन महिन्याकरीता याप्रमाणे पाणीपट्टी आकारणेत यावी.

त्याच बरोबर कुपवाड ड्रेनेज योजनेमध्ये स.नं.१५१ क्षेत्र ११५०० चौ.मी.या ठिकाणी मलशुद्धीकरण केंद्र (STP) व अहिल्यानगर स.नं.३४३,१,२ब क्षेत्र १६२४.०५ चौ.मी. व तुळजाईनगर स.नं.१४६/अ१, क्षेत्र १४२८ चौ.मी. तसेच जागृती संपगृह २५/१ खुली जागा क्षेत्र ५७६.७५ चौ.मी. या तीन ठिकाणी पंप हाऊस बांधण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, कुपवाड ड्रेनेज योजनेतील STP उभारणीसाठी स.नं.१५१ येथील १.१५ हेक्टर क्षेत्राचे पुर्वीच्या ठराव क्र.१३३ दि.१९/०१/२०१८ मध्ये अंशत: बदल करुन, मा.जिल्हाधिकारी यांचेमार्फत भूसंपादन करणेत यावे असे ही सभा सूचित करीत असून, या ठिकाणी STP बांधण्यासाठी UDCPR मधील तरतुदीनुसार सिटीपार्क आरक्षण असले तरी, STP बांधकाम करण्यास परवानगीसाठी मा.शासन मान्यतेकरीता प्रशासनाने प्रस्ताव पाठवावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते

अनुमोदक :- श्री. विष्णू माने.

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

शहर अभियंता

नगर अभियंता (जल नि:सारण)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- १८/०४/२०२२

ठराव क्रमांक :- १९३

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग,सांगली) यांचे दि.२५/०२/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना,महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमुद दोन कामांचा र.रु.२७,४१,६००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीस्तव पाठविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय र.रु.
१.	कुपवाड वॉर्ड क्र.१ येथील म्हसोबा मंदिर ते प्रकाशनगर गलली क्र.६ पर्यत रस्त्यास फुल राऊंड गटर करणे.	१०,६३,५००/-
२.	कुपवाड वॉर्ड क्र.१ शालिनीनगर पुर्व येथील शिवछत्र घर ते वंदना महाडिक घर गल्ली क्र.७ पर्यत रस्त्यास पी.सी.सी.गटर करणे.	१६,७८,१००/-
	एकूण र.रु.	**२७,४१,६००/-**

तसेच सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेल्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत तयार केलेल्या प्रस्तावामध्ये नमुद असलेली कामे योजनेसाठी असलेल्या महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन निर्णय क्र.-एन यु आर २०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३, दि.०८/११/२०१० मधील परिच्छेद क्र.-२ अभियाना अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांसाठी दिलेल्या निर्देशानुसार लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित केले असून सदर क्षेत्रातील कामास अर्थसहाय्य मिळणे करीता सुधारणा कार्यक्रमाच्या दृष्टीने महानगरपालिकेने खालील प्रमाणे कार्यवाही ठेवली आहे.

अ. क्र.	सुधार कार्यक्रम	सद्यस्थिती	पुर्ण करण्याचा कालावधी
१.	व्दिनोंद लेखापध्दतीचा अवलंब करणे	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
२.	महानगरपालिका कामकाजाचे संगणकीकरण करणे.	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
३.	मालमत्ता करविषयक सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
४.	उचीत उपभोक्ता आकार वसुली संबंधी सुधारणा	अंमलबजावणी करण्यात येत आहे.	-
५.	गरीबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षीत निधीची तरतुद करणे.	तरतुद करणेत आली आहे.	-

त्याचप्रमाणे प्रकल्प राबविणे करीता महापालिका हिस्सा यासाठी आवश्यकते नुसार वेळोवेळी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणेस महापालिका तयार आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मनगू केरु सरगर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.७३ दि.१९/०७/२०२१ अन्वये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत एकूण र.रु.१२.६९ कोटी रक्कमेचा महापालिका क्षेत्रातील एकूण १३७ कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत आलेली होती. सदर प्रस्तावातील अ.क्र.४६ वॉर्ड क्र.१७ मधील गुलाब कॉलनी येथील सि.स.नं.१०८०१,१०७९९ मधील मनपा ओपनस्पेसला वॉल कंपौंड बांधणे र.रु.२२,८९,०००/- मात्रचे कामगिरी ऐवजी वॉर्ड क्र.१७ मधील गुलाब कॉलनी येथील सि.स.नं.७१/१,७१/२,७१/३ मधील मनपा ओपनस्पेसला वॉल कंपौंड बांधणे र.रु.२२,८९,०००/- मात्रचे कामगिरीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.५४ दि.१९/०७/२०२१ अन्वये सन २०२१-२२ मधील आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत र.रु.११,३०,००,०००/- मात्रचा निधी मंजूर रक्कमेचा महापालिका क्षेत्रातील एकूण १०८ कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस मान्यता देणेत आलेली होती. सदर प्रस्तावातील खालील नमुद अ.क्र.१००, १०६ आणि १०७ ही कामे रद्द करुन, त्याऐवजी खालील नमुद केलेल्या चार कामांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता आहे.

अ.क्र.	रद्द करावयाचे कामाचे नाव	र.रु.
१.	मिरज वॉ.क्र.२० अ प्राथमिक आरोग्य क्र.१० पहिला मजला सुधारणा करणे (अनु.क्र.१००)	१०.०० लक्ष
२.	मिरज वॉ.क्र.२० अ प्राथमिक शाळा क्र.१३ परिसर दुरुस्ती करणे (अनु.क्र.१०६)	१५.०० लक्ष
३.	मिरज वॉ.क्र.२० अ शाळा नं.२५ व २६ चे क्रिडांगण दुरुस्ती करणे (अनु.क्र.१०७)	१५.०० लक्ष

अ.क्र.	प्रस्तावित कामाचे नाव	र.रु.
१.	मिरज वॉर्ड क्र.२० मध्ये योगीनगर येथे पेव्हींग ब्लॉक करणे	१०.०० लक्ष
२.	मिरज वॉर्ड क्र.२० मध्ये ख्वॉजा वस्ती गल्ली नं.१ (धनगर गल्ली येथे गटर बांधकाम करणे)	१०.०० लक्ष
३.	मिरज वॉर्ड क्र.२० मध्ये ख्वॉजा वस्ती येथील १०० फुटी रोड येथील फुलराऊंड पाईप गटर करणे.	१०.०० लक्ष
४.	मिरज वॉर्ड क्र.२० मध्ये हरिपूर रोड परिसरातील रस्ते मुरुमीकरण, खडीकरण, बी.बी.एम.करणे.	१०.०० लक्ष

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.सविता शेडजी मोहिते यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा ठराव क्र.५४ दि.१९/०७/२०२१ अन्वये मजूर अ.क्र.३२ कुपवाड वॉर्ड क्र.२ अ स्वामी मळा मधील समाज स्मशान भूमीस चेनलींक कंपौंड करणे र.रु.४,४०,७००/- मात्रची कामगिरी ऐवजी कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील शेसवरे यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रिट करणे र.रु.४,४०,७००/- आणि मा.महासभा ठराव क्र.७३ दि.१९/०७/२०२१ अन्वये मंजूर अ.क्र.७४ कुपवाड वॉर्ड क्र.२ वाघमोडे नगर मधील मायाक्का मंदिर दक्षिण बाजूचे रस्ते कॉंक्रिट करणे र.रु. १८,५८,६००/- मात्रची कामगिरी ऐवजी कुपवाड वॉर्ड क्र.२ मधील वाघमोडे नगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे र.रु.१८,५८,६००/- मात्रच्या कामगिरीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी सादर करणेस ही सभा मान्यता आहे.

सूचक :- श्री.शेडजी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विष्णू माने. D.P. Suryavanshi महापौर,

मुख्य अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका